देशोन्नती

# सन्मान स्त्री शक्तीचा संकल्पनेतून ' निळकंठराव शिंदे महाविद्यालयात पदवी प्रदान , गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण कार्यक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

## विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : मान्यवरांचे मार्गदर्शन




**भद्रावती** ▪ स्थानिक निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयात संस्थाध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांच्या सन्मान स्त्री शक्तीचा संकल्पनेतून सांस्कृतिक विभाग व बक्षीस वितरण समितीच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहात दि. ११ ऑक्टोबर रोजी शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ मधील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान तसेच सत्र २०२२ -२०२३ मधील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. उपस्थितांना मान्यवरांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपिठावर अध्यक्षस्थानी स्थानिक प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रिया शिंदे, प्रमुख अतिथी मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळके यांच्यासह भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे, संस्थेचे विश्वस्त सेवानिवृत्त प्राचार्य मोहन पुसनाके, कार्यक्रमाचे आयोजक प्राचार्य डॉ.एल.एस. लडके आणि प्रा. डॉ. अपर्णा धोटे प्रामुख्याने उपस्थित होत्या.

सर्वप्रथम मान्यवर मंडळींच्या शुभहस्ते राजमाता जिजाऊ, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावतीचे संस्थापक सचिव स्व. निळकंठराव शिंदे यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ एल. एस. लडके यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रम आयोजना मागील भूमिका स्पष्ट केली. दरवर्षी गोंडवाना विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभानंतर संलग्नित महाविद्यालयात पदवी प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते तसेच गोंडवाना विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयातून प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती व महाविद्यालयाद्वारे पन्नास विविध बक्षिसे देण्यात येतात .त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व इतर विद्यार्थी सुद्धा गुणवत्ता यादीत येण्याकरिता प्रयत्न करतात असेही यावेळी प्राचार्य डॉ.एल.एस. लडके यांनी सांगितले.

यानंतर पदवी प्रदान समारंभास सत्र शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ मधील बी.एस्सी, बी.ए., एम. ए. आणि एम. एस्सी. अभ्यासक्रमातील नम्रता देसाई, खुशबू लीलारे, कुणाल पतरंगे, मयूर गौरकार, मेहंदी चालखुरे, नूतन कोरडे, नेहा प्रसाद, अमोल गायकवाड, वर्षा कुत्तरमारे, प्रतीक्षा खंगार, दामिनी काकडे, विद्या धोटे, जयश्री पारखी, प्रयोगा तेलंग, गौरव कुळसंगे, आकांक्षा आवारी, विजय फुलकर, मेघा यडलावार, राकेश सिंग, मोनीश कातवडे, अश्विनी कडूकर व आशिष निखाडे या विद्यार्थ्यांना उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. तसेच एन.सी.सी. मध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रथम बोरकुटे, रुपेश देशमुख, सिमरन शेख, निखिल भुसेवार, यश कामतकर, प्रणिता वाबेडकर व पंकज सोयाम यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मुख्याधिकारी डॉ. विशाखा शेळके यांचा डॉ. प्रिया शिंदे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ .विशाखा शेळके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यात विद्यार्थ्यांना शालेय जीवन सोडून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करीत असल्यामुळे त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. त्यामुळे यश गाठणे महत्त्वाचे व आवश्यक आहे. तसेच आज मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे मुलींनी आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे. आज स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याची नितांत गरज आहे. त्या करिता जिद्द, चिकाटी व मेहनत करण्याची आवश्यकता आहे. तसेच जीवनात यशस्वी होण्याकरिता व्यसनापासून दूर राहण्याची सोबच आपले ध्येय गाठण्यासाठी मार्ग निश्चित करण्याची गरज आहे. असे मार्गदर्शन केले. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या गुणवत्ता यादीत स्थान निश्चित केल्याबद्दल भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावती, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यातर्फे शिष्यवृत्ती रोख स्वरूपात आणि प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यात प्रफुल लोहे, सिद्धांति सोनवणे, अनामिका चौधरी, नम्रता लांजेवार, ऐश्वर्या तिवारी, सृष्टी शर्मा, माधवी कडूकर, शुभम असम्पल्लिवार, आफ्रीन शेख, कोमल जंगापल्ली, यामिनी मारापल्ली, समीक्षा स्वान, गुडिया पठाण, प्राची वाभिटकर, प्रांजली विश्वास, राजश्री दीक्षित, प्रणिता वामीटकर, विधी शर्मा, महेश्वरी काळे, सुप्रिया बाळपणे, सोनम विधाते, सोनम विधाते, अनुष्का जवडे, इशिका वाकडे, सोनाली बावणे, प्रशांत बडगुळवार, परिक्षिता काकडे, कुणाल पतरंगे व दिव्या पझारे यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालया तर्फे उत्कृष्ट विद्यार्थी कुमारी अनामिका चौधरी हिला 'स्टुडन्ट ऑफ द इयर' हा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रसिद्ध स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. प्रिया शिंदे यांचा डॉ. अपर्णा धोटे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. प्रिया शिंदे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात सर्वप्रथम पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना व गुणवत्ता यादीत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आता तुमची समाजाप्रती जबाबदारी वाढली. त्याकरिता अथक परिश्रम करणे आवश्यक आहे . तुमच्या यशामागे शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे .त्यामुळे विद्यार्थी घडतो आणि प्रगती करतो .आपल्या पायावर उभा राहण्यास मदत होते. उपस्थित विद्यार्थ्यांनीची संख्या लक्षात घेता, आज सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणाबद्दलचे स्वप्न पूर्ण होताना दिसते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणामुळे देशाचे चांगले नागरिक होण्यास मदत होते .असे विचार व्यक्त केले. याप्रसंगी सर्व पदवी प्राप्त विद्यार्थी व गुणवंत विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आपल्या पालकासहित उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयुक्त सुत्रसंचालन प्रा. डॉ. अपर्णा धोटे, प्रा .डॉ .राजेश हजारे ,प्रा. डॉ.पी. एन. नासरे व प्रा डॉ. किरण जुमडे तर आभार प्रदर्शन प्रा .डॉ अपर्णा धोटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा .डॉ.नरेंद्र हरणे, डॉ.शशिकांत शित्रे, प्रा. डॉ नथ्थू वाढवे, प्रा डॉ.प्रवीण कुमार नासरे, प्रा डॉ. राजेश हजारे, प्रा सचिन श्रीराम, प्रा. डॉ. अजय दहेगावकर, प्रा. कुलदीप भोंगळे, डॉ. खादरी, प्रा संदीप प्रधान, किशोर भोयर, सुकेशनी भावसागर, विशाल गौरकार, विजय मदनकर, शरद भावरकर, पांडुरंग आखतकर, प्रमोद तेलंग, खुशाल मानकर तसेच एन.सी.सी. चे सर्व विद्यार्थी यांनी महत्वपूर्ण सहकार्य केले.या प्रसंगी कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

( ता. प्र. )

Deshonnati Edition
Oct 13, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com